पोष्टाचा दाखला जोडून
खास दुतामार्फत

क्र. जिपगों/मवबाक / का-२/ ५९८ /२०१८
कार्यालय, जिल्हा परिषद,गोंदिया
(महिला व बालकल्याण विभाग)
दिनांक :- २३ /७ /२०१८

## नमुना अ

(महिला व बालकल्याण समिती सभेचे नोटीस)

मा.श्री/श्रीमती ------------------------------------------------------------सदस्य/सदस्या,महिला व बालकल्याण समिती,मु.-----------------पो.--------------------ता.------------------जिल्हा -गोंदिया यांना याद्वारे कळविण्यात येते की महिला व बालकल्याण समितीची मासिक सभा दि **१ /८ /२०१८ रोज बुधवारला** दुपारी १.०० वाजता मा. सभापती, महिला व बालकल्याण समिती , जिल्हा परिषद, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली नमुना -अ चे जोडपत्रात उल्लेखित विषयांचे कामकाज चालविण्याकरीता आयोजित करण्यात आली आहे.सदरहू सभेला आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

टीप: **कोरमअभावी तहकूब करण्यात आलेली सभा सात दिवसाचे आत घेण्यात येईल.**

सभेचे स्थळ : मा. महिला व बालकल्याण सभापती यांचे कक्ष.

सदस्य सचिव महिला व बालकल्याण समिती तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक),
जिल्हा परिषद, गोंदिया

**नमुना अ चे जोडपत्र**

१) मागील सभेच्या कार्यवृत्ताचे वाचन करून कार्यवृत्त कायम करणे.
२) शासकीय परिपत्रकांचे वाचन करणे.
३) सन २०१७-१८ चे योजनांच शिल्लक निधी खर्च करणे बाबत.
४) जिल्हा महिला मेळावा आयोजित करण्याबाबत.
५) सन २०१८-१९ वर्षातील अभ्यास दौरा निश्चीत करणे बाबत.
६) सन २०१८-१९ चे योजनाचे दर निश्चीत करणे बाबत.
७) श्रीमती मदनू सडवली बोगे यांचे कोर्ट केस संदर्भात घेण्यात आलेले अग्रीम रु १.०० लक्ष खर्चास मंजूरी मिळणे बाबत.
८) मा.सभापती यांचे अनुमतीने वेळेवर येणारे इतर विषय.

सदस्य सचिव महिला व बालकल्याण समिती तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक),
जिल्हा परिषद, गोंदिया

**<u>प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर.</u>**

१) मा. अध्यक्षा/उपाध्यक्षा/सभापती-----------------------------------------------------जि.प. गोंदिया.
२) मा. श्रीमती लता दोनोडे,सभापती, महिला व बालकल्याण समिती, जि.प. गोंदिया.
३) मा. मुख्यकार्यकारी अधिकारी/ मा. अतिरिक्त मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया.
४) मा. श्री/श्रीमती----------------------------------------------स्थायी समिती सदस्य, जिल्हा परिषद, गोंदिया.

**प्रतिलिपी माहितीस्तव समादराने अग्रेषित.**

५) विभागप्रमुख ------------------------------------------------(सर्व), जि.प. गोंदिया.

**प्रतिलिपी माहितीस्तव अग्रेषित.**

६) जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, गोंदिया.
७) बालविकास प्रकल्प अधिकारी, ए.बा.वि.से.यो.प्रकल्प-------------------------------- ----(सर्व)
८) संचालक महिला समुपदेशन केंद्रं ------------------- मार्फत बालविकास प्रकल्प अधिकारी पकल्प ------------ -------------- यांना आपण आपले मासिक अहवालासह सदर समिती सभेस न चुकता उपस्थित राहावे.

सदस्य सचिव महिला व बालकल्याण समिती तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक),
जिल्हा परिषद, गोंदिया

# महिला व बालकल्याण समिती ,जिल्हा परिषद गोंदिया
## दिनांक ४ /७ /२०१८ च्या सभेचे कार्यवृत्त

| अ.क्र | सभेची तारीख व वेळ | उपस्थित सदस्याचे नाव | इतर उपस्थितांचे नाव | प्रस्तावित विषय | संक्षिप्त कार्यवृत्त व ठराव |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४/७/२०१८ दुपारी १.०० वा. | हजेरी रजिष्टर नुसार | हजेरी रजिष्टर नुसार | खालील प्रमाणे | खालील प्रमाणे |

महिला बालकल्याण समिती जिल्हा परिषद गोंदिया ची सभा दिांक ४/७/२०१८ रोजी ठिक दुपारी १.०० वाजता सुरु करण्यात आली. सदर सभेला अध्यक्ष मा.सभापती श्रीमती लता दानोडे तथा समितीचे सदस्य सचिव मा.श्री तुषार पौनिकर उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालकल्याण यांचे उपस्थितीत सभा सुरु करण्यात आली. मा.श्री तुषार पौनिकर यांनी समितीमध्ये उपस्थिती असलेल्या सर्व अधिकारी कर्मचारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात केली.

**विषय क्रमांक १ :-** मागील सभेच्या कार्यवृत्ताचे वाचन करण्यात आले.

**ठराव क्रमांक १ :-** मागील सभेच्या कार्यवृत्ताच्या प्रती उपस्थित सर्व सदस्यांना देण्यात आल्या सभागृहात कार्यवृत्ताचे वाचन करण्यात आले. त्यामध्ये मुद्दा क्रमांक ३/१ मध्ये सालेकसा अंतर्गत कोठेवाडा अंतर्गत साखरीटोला असा उल्लेख करण्यात आला असून त्या ऐवजी कोटरा अंतर्गत सिंगाटोला अशी दुरुस्ती तसेच विषयक क्रमांक ३/१ मध्ये अंगणवाडी सेविका / मदतनीस यांना दोन महिने सुटया मंजूर करण्याबाबत असा उल्लेख असून त्यामध्ये दोन महीने ऐवजी एक महिना अशी दुरुस्ती करुन कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**विषय क्रमांक २ :-** शासन परिपत्रकाचे वाचन करणे.

**ठराव क्रमांक २ :-** अंब्रेला एकात्मिक बालविकास सेवा योजना या मुख्य योजनेअंतर्गत राबविण्यात येणा-या उपयोजनांची नवीन नावे लागू करणे व योजनामधील विवीध बाबीचे सुधारित दर लागू करणे बाबत. महिला व बालविकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक एबावि-२०१७४ /प्रक्र३४८/का-६/दि ३० जून २०१८ चे वाचन करण्यात आले.

**विषय क्रमांक ३ :-** सन २०१८-१९ करिता जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती व (आंतर क्षेत्र बाहय क्षेत्र ) प्राप्त नियतव्ययास तसेच योजना मंजूरी मिळणेबाबत.

**ठराव क्रमांक ३** सन २०१८-१९ करिता जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत पत्र क्रमांक सहाय्यक आयुक्त समाजकल्याण विभाग यांचे पत्र क्रंमाक/सआस/कागो/अजा/उपयो/अर्थसंकल्पीय अंदाज /२०१८-१९ / १३६४ / दि ११/६/२०१८ अन्वये अनुसूचित जाती उपयोजना SCP करिता ६०.०० लक्ष प्राप्त झाले.

व प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प देवरी यांचे पत्र क्रमांक नियो/प्रक्र का-५(अ) २०१५/२०१८ दि २२/५/२०१८ अन्वये जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना TSP २५.०० लक्ष रुपये बाहय क्षेत्र उपयोजना OTSP करिता ६.४२ अंतर्गत नियतव्यय मंजूर करण्यात आले आहे. सदर नियतव्ययास समिती सभेस मंजूरी प्रदान करावी. तांत्रिक व प्रशासकिय मान्यता शासन स्तरावरुन घेण्यात येईल. तसेच सन २०१८-१९ मध्ये निवड केलेल्या योजनेचा सदर नियतव्ययामधून लाभ देण्यात येईल.

तसेच **शासन निधी** प्राप्त अनूदानातून (SCP/TSP/OTSP) ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय दिनांक २४/१/२०१४ नुसार अनुसचित जाती /जामती उपयोजना अंतर्गत गट अ मधील शिवनकला व फॅशन डिझायनींग प्रशिक्षण, मराठी इंग्रजी टाईपींग (२० %) तसेच इतर योजनातून संगणक प्रशिक्षण ( MSCIT ) निवड करण्यात येत आहे. तसेच साहित्य खरेदी मध्ये मोफत दोन चाकी लेडीज सायकल व पिकोफॉल मशीन चे स्थानिक बाजारातील सरासरी दराचे मुल्य समिती निश्चीत करेल त्या मुल्याचे ९० % अनुदान DBT द्वारे थेट लाभ लाभार्थ्यास शासन निर्णयाचे अधिन राहून अदा करण्यात येईल.

तसेच **जिल्हा निधी** प्राप्त अनूदानातून सर्वसाधारण ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय दिनांक २४/१/२०१४ नुसार साहित्य खरेदी मध्ये मोफत दोन चाकी लेडीज सायकल व पिकोफॉल मशीन चे स्थानिक बाजारातील सरासरी दराचे मुल्य समिती निश्चीत करेल त्या मुल्याचे ९० % अनुदान DBT द्वारे थेट लाभ लाभार्थ्यास शासन निर्णयाचे अधिन राहून अदा करण्यात येईल.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**मा.सभापती महोदया यांचे अनुमतीने वेळेवर येणारे विषय**

**अति.विषय क्रमांक ४/१ :-** सेविका मदतनीसचे पदे रिक्त असल्याबाबत.

**अति.ठराव क्रमांक ४/१ :-** सदर विषयावर चर्चा करतांना मा. सभापती महोदया यांनी त्यांचे क्षेत्रातील बारकरी टोला व हलबीटोला अशा दोन अंगणवाडी करिता एकच सेविका काम करिता आहे.त्यामुळे अंगणवाडीतील मुलांचे नुकसान होत आहे. हलबीटोला येथे अंगणवाडी सेविका पद रिक्त असल्याबाबत माहिती दिली. तसेच चर्चेत पाऊलझोला येथील सेविकाचे पद रिक्त असल्याबाबत माहिती दिली. यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री तुषार पौनिकर यांनी शासनाचे पत्रानुसार पुढील पदाचा आढावा होईपर्यंत भरती प्रक्रिया बंद आहे. परंतू लगतच्या अंगणवाडी सेविकामार्फत सदरअंगणवाडीचे काम सुरु आहे.यावर मा. सभापती महोदया यांनी अंगणवाडी सेविका,मिनी अंगणवाडी सेविका व मदतनिस यांचे रिक्त पदामुळे एकात्मिक बाल विकास सेवायोजने अंतर्गत लाभार्थ्यांना ज्या सेवा देण्यात येत आहे ते देण्यात येत नाही तरी गोंदिया जिल्हातील अंगणवाडी सेविका,मिनी अंगणवाडी सेविका व मदतनिस यांचे रिक्त पद भरणे बाबत शासनास प्रस्ताव विभागाकडून पाठविण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**अति.विषय क्रमांक ४/२ :-**सन २०१६-१७ च्या योजनाचे लाभार्थ्यांचे खात्यात साहित्याची रक्कम टाकण्यात आली किंवा नाही अशी विचारणा सन्मा. सदस्य श्री पंघरे यांनी केली असता सन २०१७-१८ ची कार्यवाही सुरु असल्याची माहिती सभागृहात दिली.

**अति. विषय क्रमांक ४/३ :-** मा. सभापती महोदया यांनी सन २०१८-१९ चे योजनांचे अर्ज माहे ऑगष्ट पर्यंत सादर करण्याचे निर्देश सर्व बालविकास प्रकल्प अधिकारी यांना दिल्या.

**अति. विषय क्रमांक ४/४ :-** मा.सभापती महोदया यांनी प्रकल्प तिरोडाचा पदभार स्विकारण्याबाबत श्री भोसले बालविकास प्रकल्प अधिकारी प्रकल्प गोंदिया-२ यांना विचारणा केली असता. श्री भोसले बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्प गोंदिया ते तिरोडा अंतर जास्त असल्याने दोन ठिकाणी पदभार स्विकारणे श्यक्य नसल्याची माहिती दिली तसेच प्रकल्प तिरोडा येथील जेष्ठ अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना बालविकास प्रकल्प अधिकारी पदाचा पदभार शासन निर्णयान्वये देण्यात येण्याबाबत विनंती केली तसेच श्रीमती शहारे हया जेष्ठ असून त्या काम सांभाळत आहेत त्याना पदभार देण्याबाबत सूचित केले त्यावर मा. सभापती महोदया यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना श्रीमती शहारे यांचेकडे बालविकास प्रकल्प अधिकारी पदाचा पदभार देण्याबाबत सूचविले.

**अति.विषय क्रमांक ४/५ :-** अंगणवाडी पर्यवेक्षिकाची पदे रिक्त असल्याबाबत.

**ठराव क्रमांक ४/५:-** श्री. सरडे बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी त्यांचे प्रकल्पात अंगणवाडी पर्यवेक्षिकांची पदे जास्त प्रमाणात रिक्त असल्याची माहिती दिली नियमीत पणे भरता येत नसली तरी कामे पुर्ण करण्याचे दृष्टीने लगतच्या क्षेत्रातील अंगणवाडी पर्यवेक्षिका तात्पुरत्या स्वरुपात देण्याबाबत विनंती केली असता उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाक यांनी याबाबत विचार करुन निर्णय घेण्यात येईल अशी माहिती दिली. यावर मा सभापती महोदया यांनी प्रकल्प सालेकसा, प्रकल्प मोरगाव अर्जूनी , प्रकल्प देवरी हा भाग नक्षलग्रस्त व दुर्गम असून अंगणवाडीतील बालकांची सेवा ही सुरळीत असणे व त्यावर नियंत्रण ठेवण्याकरित अंगणवाडी पर्यवेक्षिकांची पदे तातडीने भरणेबाबत शासनास पत्र देण्याबाबतचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**अति.विषय क्रमांक ४/६ :-** सन्मा. सदस्या श्रीमती मडावी यांनी श्री सरडे बालविकास प्रकल्प अधिकारी प्रकल्प अर्जूनी मोर यांना अंगणवाडी पर्यवेक्षिकांचे प्रवास भत्ता देयक अजूनपर्यत पारित का झाली नाही अशी विचारना केली असता श्री सरडे बालविकास प्रकल्प अधिकारी प्रकल्प अर्जूनी मोर यांनी अनुदान उपलब्ध नसल्याने देयके पारित करता आलेली नसल्याची माहिती दिली.सन्मा सदस्या श्रीमती चौरागडे यांनी त्यांचे प्रकल्पातील अंगणवाडी मध्ये बसता येत नाही. तीला दुरुस्ती करावी किंवा नवीन बांधकाम करावे याबाबत बांधकाम विभागाकडून अहवाल प्राप्त करुन अंगणवाडी बांधकाम किंवा दुरुस्ती करण्याबातच्या सुचना दिल्या.

**अति.ठराव क्रमांक** ४/६:- सन्मा. सदस्या श्रीमती खुशबू टेंभरे यांनी श्री.भोसले बा.वि.प्र.अधिकारी यांना विचारणा केली की बाल विकास प्रकल्प अधिकारी पदाचा पदभार केव्हा पासून नियमीतपणे स्विकरला आहे व स्विकारल्यानंतर प्रकल्प भेटी झालेल्या आहेत किंवा नाही.यावर श्री भोसले बालविकास प्रकल्प अधिकारी प्रकल्प गोंदिया -२ यांनी पदभार दिनांक ३०/६/२०१८ ला स्विकारलेला असून अजून पर्यत प्रकल्पात भेटी झालेल्या नाहीत अशी माहिती दिली असता श्रीमती प्रकल्प भेटीचा कार्यक्रम तयार करावा व त्यात मला सुद्धा बोलाविण्यात यावे अशा सुचना सन्मा. सदस्या यांनी दिल्या.

**अति.विषय क्रमांक ४/७** :-अंगणवाडी सेविका /मदतनीस यांनी गणवेशात अंगणवाडीमध्ये उपस्थित राहण्याबाबत.

सन्मा. सदस्या श्रीमती पाऊलझगडे तसेच श्रीमती मडावी यांनी सेविका मदतनीस यांना गणवेशाकरिता अनुदान दिल्यानंतरही त्या गणवेशात येत नाही. त्यांना बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी गणवेशात येण्याबाबतचे निर्देश देण्याबाबत अवगत केले. सन्मा. सदस्या श्रीमती बालदे यांनी अंगणवाडी सेविका /मदतनीस यांनी गणवेशाचा वापर केला नाही तर त्यांना अनुदान देण्यात येऊ नये असे मत नोंदिवले.यावर मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व बालविकास प्रकल्प अधिकारी यांना अंगणवाडी सेविका मदतनीस नियमीत गणवेशात येतील अशा सुचना देण्याचे निर्देश दिले.

**अति.विषय क्रमांक ४/८ :-**अंगणवाडीतील बालकांकरिता गणवेश देणेबाबत.

**अति.ठराव क्रमांक ४/८ :-** सन्मा. श्रीमती खुशबू टेंभरे यांनी अंगणवाडीतील मुलांना गणवेश असावा असे मत नोंदविले असता त्यावर मा. सभापती महोदया यांनी व सर्व सदस्यानी एकमत नोंदविले. गणवेश घेण्याकरिता आवश्यक निधीची मागणी करण्याबाबतचा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला. यावर उपमुकाअ बाक यांनी जिल्हा वार्षिक योजनेमधून सदर बाबी करिता अनुदान मागणी केल्यास अनुसूचित जाती व जमातीच्याच घटकांना सदर योजनेचा लाभ दिला जाईल. म्हणून जिल्हा निधीमधून या बाबी करिता मागणी केल्यास सर्वच घटकाच्या लाभार्थ्यास. लाभ दिला जाईल म्हणून जिल्हा निधी मधून निधी मागणी करण्याबाबतची माहिती सभेत दिली. यावर सर्वाचे एकमताने मंजूरी दिली.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**अति. विषय क्रमांक ४/९ :-** अंब्रेला एकात्मिक बालविकास सेवा योजना या मुख्य योजनेअंतर्गत राबविण्यात येणा-या उपयाजनांची नवीन नावे लागू करणे व योजनामधील विवीध बाबीचे सुधारित दर लागूकरणे बाबत. महिला व बालविकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक एबावि-२०१७४ /प्रक्र३४८/का-६/ दि ३० जून २०१८ बाबत.

**अति.ठराव क्रमांक ४/९ :-** अंब्रेला एकात्मिक बालविकास सेवा योजना या मुख्य योजनेअंतर्गत राबविण्यात येणा-या उपयोजनांची नवीन नावे लागू करणे व योजनामधील विवीध बाबीचे सुधारित दर लागूकरणे बाबत. महिला व बालविकास विभागाचे शासन निर्णय क्रमांक एबावि-२०१७४ /प्रक्र३४८/का-६/ दि ३० जून २०१८ चे वाचन करण्यात आले.

सन्मा.सदस्य श्री जियालालजी पंधरे यांनी विचारना केली असता सदर दर केव्हा पासुन लागु करण्यात येइल यावरुन मा.सचिव यांनी सदर आहार चे सुधारित दर दि १/८/२०१८ पासून देण्यात येईल असे सांगितले. सध्या अंगणवाडी मध्ये प्रति लाभाथी दर रु ६/- प्रमाणे देण्यात येत आहेत. अंगणवाडीच्या आहारात बदल झालेला आहे किंवा नाही अशी विचारणा केली असता यावर सचिव ची आहार च्या पाककृती मध्ये बदल बाबत कुठलेच निदेश प्राप्त झाले नसल्याचे सांगितले.

मुद्दा क्रमांक २० वर सरकारी मालकीच्या ज्या इमारतीमध्ये शौचालय उपलब्ध नाहीये अश्या इमारतीमध्ये शौचालय बांधणे करिता केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा ६०:४० असा आहे . त्या अनुषगाने शौचालय बाधकाम करिता रु. १२,०००/- मंजुर करण्यात आलेले आहे. यावर सन्मा.सदस्या श्रीमती वालदे शौचालय बाधकाम हे रु. १२,०००/- मध्ये होऊ शकत नसल्याचे सदर निधी प्रति शौचालय बाधकाम रु. ६०,०००/- मंजुर करण्याकरिता प्रस्ताव शासनास सादर करणे बाबत आपले मत नोदविले . यावर सर्व सन्मा.सदस्य यांनी सदर शासन निर्णय मध्ये सुधारणा करण्याकरिता प्रस्ताव शासनाकडे पाठविणेबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले .

**ठराव सर्वानुमते मंजुर.**

**अति.विषय क्रमांक ४/१० :-** सन्मा. सदस्या श्रीमती वालदे यांनी पुर्वी प्रमाणेच सायकल शिलाईनचे वाटप करण्याबाबत

**अति.ठराव क्रमांक ४/१० :-** सन्मा. सदस्या श्रीमती वालदे यांनी पुर्वी प्रमाणेच सायकल शिलाईनचे वाटप करण्यात यावे असे मत दिले. त्यावर श्रीमती मडावी,श्रीमती टेंभरे यांनी त्यावर अनुमोदन नोंदविले. असता मा सभापती महोदया यांनी सर्वसम्मतीने योजनाचे शासनाचे निर्देशानुसार DBT पद्धत रद्द करुन पुर्वी प्रमाणेच साहित्य वाटप करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. व तसा ठराव शासनास विभागाकडून सादर करण्याचे निर्देश दिले.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**अति.विषय क्रमांक ४/११ :-** सन्मा.सदस्य श्रीमती मडावी यांनी बचत गटास गहू तांदुळ मिळत नसल्याबाबत सांगितले. असता विभागाकडून पुरवठा अधिकारी यांना गहू तांदूळ देण्याचे पुरवठाआदेश देण्यात येतात. पंरतू पुरवठा अधिकारी यांचे कडून तालुक्यामधील तहसिलदार यांचे मार्फतीने राशन दुकानामध्ये पुरवठा करण्याची जबाबदारी असल्याने बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी त्याबाबत शहनिशा करुन अहवाल सादर करणे आवश्यक आहे.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाक) यांनी बालविकास प्रकल्प अधिकारी यांना याबाबत निर्देश दिले.

सन्मा.सदस्या श्रीमती वालदे यांनी बचत गटाचे बील पारित झाले नसल्याची माहिती सभेत दिली असता बचत गटानी दिलेले खाते क्रमांक बरोबर नसल्याची माहिती दिली असे एक दोन ठिकाणीच झालेले असल्याची माहिती श्री वाघ बालविकास प्रकल्प अधिकारी प्रकल्प गोरेगाव यांनी दिली (उदा गोरेगाव येथील कटंगी )

**अति.विषय क्रमांक ४/१२ :-**अंगणवाडीमध्ये लाईटची व्यवस्था,सेविका करिता खुर्ची,मुलांकरिता घसरपटटीची व्यवस्थाकरणे बाबत.

**अति.ठराव क्रमांक ४/१२ :-** अंगणवाडीमध्ये लाईटची व्यवस्था,सेविका करिता खुर्ची, मुलांकरिता घसरपटटी ची व्यवस्थाकरणे बाबत. विषयावर चर्चा करतांना सन्मा सदस्या श्रीमती वालदे यांनी अंगणवाडीमध्ये लाईटची व्यवस्था,सेविका करिता खुर्ची, मुलांकरिता घसरपटटीची व्यवस्था ग्रामपंचायतच्या स्वउत्पन्नामधून वरील व्यवस्था करावी यावर सर्वांनी एकमताने मंजूरी दिली.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**अति.विषय क्रमांक ४/१३:- प्रकल्प आमगाव येथे कनिष्ठ सहाय्यक मिळणेबाबत.**

**अति.ठराव क्रमांक ४/१३ :-** प्रकल्प आमगाव येथे कनिष्ठ सहाय्यकाचे पद रिक्त आहे बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभागाकडे कनिष्ठ सहाय्यकाची मागणी करुनही सार्वत्रिक बदल्यामध्ये कनिष्ठ सहाय्यक मिळाले नाही. त्यामुळे कामे करतांना अडचणीचा सामना करावा लागत असल्याची माहिती दिली . कनिष्ठ सहाय्यक मिळण्याकरिता विभागाकडून सामान्य प्रशासन विभागास पत्र देण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**अति.विषय क्रमांक ४/१४:-** समुपदेशन केंद्रांना वाटप करण्यात येणारी अनुदान तसेच योजना करिता वितरीत करण्यात येणारे अनुदान बालविकास प्रकल्प कार्यालयांना देणे बाबत.

**अति.ठराव क्रमांक ४/१४:-**सदर अनुषंगाने समुदपदेशनाकरिता व योजनाकरिता वितरित करण्यात येणारे अनुदान हे खंड विकास अधिकारी यांचे कडे वितरीत करण्यात येते. त्यामुळे योजना राबवितांना निधी वेळेवर खर्च होत नाही. सदर अनुदान बालविकास प्रकल्प अधिकारी यांचे स्तरावर देण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**अति.विषय क्रमांक ४/१५:-** सन २०१६-१७ मध्ये जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण योजने अंतर्गत अंगणवाडी बांधकाम कु-हाडी येथील मंजूरी बाबत.

**अति.ठराव क्रमांक ४/१५:-** सन २०१६-१७ मध्ये जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण योजने अंतर्गत अंगणवाडी बांधकाम कु-हाडी येथे मंजूर करण्यात आली होती .सदर ठिकाणी आजपर्यंत अंगणवाडी बांधकामाकरिता जागा नमिळाल्यामुळे बांधकाम झालेले नाही. त्यामुळे अंगणवाडी बांधकाम गोरेगाव प्रकल्पाअंतर्गत पिडकेपार ग्रामपचांयत अतर्गत कन्हारटोली येथे करण्यास सर्वानमते मंजूरी प्रदान करण्यात आली. तसेच सदर बांधकाम मंजूरीस दोन वर्ष पुर्ण झाल्याने शासनाकडून सदर बांधकामास मंजूरीचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

**अति.विषय क्रमांक ४/१६ :-** सन २०१७-१८ मध्ये विशेष घटक योजन करिता मिळालेला अनदान सन २०१८-१९ मध्ये खर्च करण्याची परवानगी मिळणेबाबत.

**अति.ठराव क्रमांक ४/१६ :-** सन २०१७-१८ मध्ये विशेष घटक योजन अंतर्गत ३५,००,०००/- अनुदान मंजुर होता. पण मंजुर अनुदान प्रमाणे लाभार्थी न मिळाल्यामुळे फक्त रु. १७३५१६०/- अनुदान खर्च झालेला आहे. उर्वरीत १७,६४,८४० /- अनुदान शिल्लक आहे. तसेच आदिवासी उपयोजना मध्ये २३,००,०००/- अनुदान उपलब्ध होते पैकी ११३००८५/- एवढे अनुदान खर्च झाले उर्वरित ११६९९१५/- एवढे अनुदान शिल्लक आहे तसेच आदिवासी उपयोजना (बाहय क्षेत्र ) अतर्गत ३६३०००/- अनुदान प्राप्त असून ३२३६३० खर्च असून ३९३७०/- शिल्लक आहे. शिल्लक अनुदान सन २०१८-१९ मध्ये खर्च करण्यास सर्वानुमते ठरविण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

यानंतर सभेसमोर इतर विषय चर्चेकरिता नसल्याने मा. अध्यक्षा यांचे अनुमतीने मा. श्री. पी मानकर बालविकास प्रकल्प अधिकारी प्रकल्प आमगाव यांनी उपस्थित श्रीमती लता संजय दोनोडे सभापती व इतर सन्मा. सदस्या /सदस्य तसेच अधिकारी कर्मचारी यांचे आभार माणून मा.अध्यक्षा यांच्या परवागीने सभेचे कामाकाज समाप्त करण्यात आले.

(श्रीमती लता संजय दानोडे)
अध्यक्षा
महिला व बालकल्याण समिती
जिल्हा परिषद गोंदिया.

( श्री तुषार व्ही पौनिकर )
सदस्य सचिव
महिला व बालकल्याण समिती तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद गोंदिया

**प्रतिलीपी माहितीस्तव सविाय सादर.**

१) मा.अध्यक्षा/उपाध्यक्षा/सभापती -----------------------------------------------जि.प. गोंदिया.
२) मा. श्रीमती लता दोनोडे सभापती,महिला व बालकल्याण समिती, जि.प. गोंदिया.
३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद गोंदिया.
४) मा. श्री----------------------------------- स्थायी समिती सदस्य ,जि.प. गोंदिया.
५) मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद गोंदिया.

**प्रतिलिपी, माहितीस्तव समादराने सादर.**

६) विभाग प्रमुख ------------------------------------ (सर्व ) जिल्हा परिषद गोंदिया.

**प्रतिलिपी माहितीस्तव अग्रेषित.**

७) जिल्हा महिला व बालविकास अधिकारी,गोंदिया
८) बालविकास प्रकल्प अधिकारी,ए.बा.वि.से. योजान प्रकल्प------------------( सर्व )

सदस्य सचिव
महिला व बालकल्याण समिती तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद गोंदिया